महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९०३ /२०२३ दि. २५/०७/२०२३

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागचे हद्दीत दिनांक ३०/०७/२०२३ रोजी जितो एज्युकेशनल अॅन्ड मेडीकल ट्रस्ट, ठाणे महानगरपालिका व टाटा मेमोरीयल कॅन्सर हॉस्पिटल, मुंबई यांच्या सहकार्याने अत्याधुनिक कर्करोग व जैन मंदिर उभारण्यात येत आहे. ग्लोबल हॉस्पिटल, बाळकुम रोड, ठाणे येथे **'नियोजित कर्करोग रूग्णालय व जैन मंदिराचा भुमिपूजन सोहळा कार्यक्रम'** आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाकरीता अति महत्वाच्या व महत्वाच्या व्यक्ती तसेच मोठया प्रमाणात जनसमुदाय येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत कडून ग्लोबल हॉस्पिटल बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत महालक्ष्मी मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डावे वळण घेवून महालक्ष्मी मंदिर नाशिक–मुंबई हायवे रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कशेळी कडून बाळकुम ग्लोबल हॉस्पिटल मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) माजिवडा गावातून लोढा संकुलातून बाहेर पडून ग्लोबल हॉस्पिटल मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा संकुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने लोढा संकुल येथून डावे वळण घेवून बाळकुम मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ३०/०७/२०२३ रोजी सकाळी ०९:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि कापुरबावडी, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CS CamScanner